**प्रसिध्दी पत्रक** दिनांक : १६/०९/२०२५

**गुंठेवारी विभाग,नांदेड वाघाळा शहर महानगरपालीका येथे कार्यरत असलेले विजय शेषराव दवणे, उपअभियंता (कंत्राटी) यांनी गुंठेवारी संचिकेवर मान्यतेच्या शिफारशीसाठी ३०,०००/— रूपयाची मागणी करून तडजोडीअंती २८,०००/— रूपयांची लाच स्विकारली म्हणुन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नांदेड यांचे जाळ्यात**

| | |
|---|---|
| **लाचलुचपत प्रतिबंधक विभाग** | **लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड युनिट** |
| पोलीस ठाणे | वजिराबाद जि.नांदेड |
| गुन्हा रजिस्टर नंबर | गु.र.नं ३९२/२०२५ कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ |
| गुन्हा दाखल दिनांक व वेळ | दिनांक १६.०९.२०२५ रोजी ०१.०६ वाजता |
| आरोपी लोकसेवक यांचे नाव, हुदद्दा व पत्ता | विजय शेषराव दवणे,वय ४६ वर्षे व्यवसाय उपअभियंता (कंत्राटी), नेम. गुंठेवारी विभाग, नांदेड वाघाळा शहर महानगरपालीका, रा. वसरणी, नांदेड. |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ३०,०००/— रूपये |
| लाच स्विकारली रक्कम | २८,०००/— रूपये |

**थोडक्यात माहिती**

यातील तक्रारदार हे परवानाधारक स्थापत्य अभियंता असून त्यांनी त्यांचेमार्फत दोन मालमत्ता धारकांची संचिका गुंठेवारी विभाग, महानगरपालीका, नांदेड येथे गुंठेवारी मंजुरीकरिता दाखल केली होती. त्या अनुषंगाने त्यांनी उपअभियंता विजय दवणे यांची भेट घेतली. तेव्हा उपअभियंता विजय दवणे यांनी त्या दोन्ही फाईलवर मान्यतेसाठी शिफारस करण्यासाठी प्रथम ६०,०००/— रूपयाची मागणी करून तडजोडीअंती ३०,०००/— रूपये घेण्याचे ठरले. तरी उपअभियंता विजय दवणे हे मागत असलेले ३०,०००/— रूपये ही लाच असून ती देण्याची तक्रारदार यांना मुळीच इच्छा नसल्याने तक्रारदार यांनी दिनांक १५/०९/२०२५ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड येथे लाचेची मागणी होत असले बाबत लेखी तक्रार दिली होती.

दिनांक १५/०९/२०२५ रोजी सदर तक्रारीच्या अनुषंगाने ईलोसे यांचे म.न.पा. नांदेड येथील त्यांचे कार्यालयात शासकीय पंचासमक्ष लाचेची पडताळणी केली. त्यावेळी यातील इतर लोकसेवक यांनी तक्रारदार यांना त्यांचेवतीने गुंठेवारी मंजूरीसाठी दाखल केलेल्या दोन मालमत्ताधारकांचे संचिकेवर मान्यतेसाठी शिफारस करण्यासाठी ३०,०००/— रूपयाची मागणी करून तडजोडीअंती २८,०००/— रूपये लाच स्विकारण्याची सहमती दर्शविली.

दिनांक १५/०९/२०२५ रोजी नांदेड वाघाळा शहर महानगरपालीकेच्या गुंठेवारी विभागात सापळा कारवाईचे आयोजन केले. त्यावेळी यातील लोकसेवक यांनी तक्रारदार यांना त्यांचे वतीने गुंठेवारी मंजुरीकरिता दाखल केलेल्या दोन संचिकेवर मान्यतेची शिफारस करण्यासाठी लाचेची रक्कम २८०००/— रूपये पंचासमक्ष स्वत: स्विकारली आहे. म्हणुन पोस्टे वजिराबाद येथे गुरनं ३९२/२०२५ कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

| | |
|---|---|
| मार्गदर्शक | श्री. संदीप पालवे, पोलीस अधीक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग नांदेड परीक्षेत्र नांदेड |
| पर्यवेक्षक अधिकारी | श्री. प्रशांत पवार, पोलीस उप अधीक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग नांदेड |
| गुन्हयाचा तपास | श्रीमती अनिता दिनकर, पोलीस निरीक्षक, लाचलूचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधावा.


| | |
|---|---|
| संपर्क पत्ता :— लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड, नागार्जुनसागर बिल्डील स्नेहनगर/श्रीनगर नांदेड | |
| संपर्क कमांक :— 02462—253512<br>टोल फ्री कमांक— 1064 | ऑनलाईन तकार ॲप्लीकेशन acbmaharashtra.net |
| मा. पोलीस अधीक्षक 9359056840 | पोलीस उपअधीक्षक 9359056840 |
| ई—मेल आयडी<br>spacbnanded@mahapolice.gov.in | ई—मेल आयडी<br>dyspacbnanded@mahapolice.gov.in |
| **FACEBOOK – Dysp Acb Nanded** | **TWITTER - @ACBnanded** |
| **INSTAGRAM – acb_nanded** | |


कार्यालय,पोलीस उप अधीक्षक ला.प्र.वि.नांदेड.युनिट

पोलीस उपअधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड